मुंबई विद्यापीठ

क्रं. ध.म./ CAS / ३९२ / २०११

संदर्भ - 1) परिपत्रक क्र. CONCOL/TAU/VCD/37, dated 21-1-2000
2) परिपत्रक क्र.ध.म./३९०/२०११ दिनांक - १९ नोव्हेंबर, २०११

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकिय आणि शासकिय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क इत्यादी, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या महाविद्यालयातील पाचव्या वेतन आयोगानुसार उपरोक्त विद्यापीठ परिपत्रक क्र. १ अन्वये जे अधिव्याख्याते आश्वासित प्रगती योजने (CAS) अंतर्गत वरिष्ठ श्रेणी किंवा निवड श्रेणी अंतर्गत बढतीसाठी पात्र असतील त्यांचे बढतीसाठीचे प्रस्ताव विनाविलंब विद्यापीठाकडे ९ डिसेंबर, २०११ पर्यंत सादर करावे.

आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत बढतीसाठी उपरोक्त विद्यापीठाचे परिपत्रक क्र.CONCOL/TAU/VCD/37, dated 21-1-2000 पात्र अधिव्याख्यातांचे प्रस्ताव सादर करताना प्रस्तावांसोबत खालील माहिती / कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत :-

१) अधिव्याख्यातांचे संपूर्ण नाव २) अधिव्याख्यात्यांचा विषय ३) वरिष्ठ श्रेणी किंवा निवड श्रेणीसाठी पात्र झाल्याचा दिनांक ४) अध्यापनाचा अनुभव ५) विद्यापीठाचे मान्यता पत्र ६) ओरिएन्टेशनचा कोर्स आणि रिफ्रेशर कोर्स प्रत्येकी एक पूर्ण केलेला असावा ७) स्वं-मुल्यमापन फॉर्म ८) अधिव्याख्यातांचा गोपनीय अहवाल (प्राचार्यांच्या सहीसह) ९) इतर आवश्यक कागदपत्रे.

जर महाविद्यालयांकडून पात्र अध्यापकांचे परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठास वर नमूद केलेल्या कालावधीत सादर करण्यात आले नाहीत तर त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

बढतीसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविताना अपूर्ण प्रस्ताव पाठवू नयेत, अशा अधिव्याख्यातांच्या प्रस्तावावर विद्यापीठास कार्यवाही करता येणे शक्य होत नाही.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर प्रलंबित प्रकरणे विनाविलंब पूर्ण करण्याकरिता तात्काळ कॅम्प आयोजित करण्यात येणार आहेत, त्याकरिता महाविद्यालयांचे सहकार्य अपेक्षित आहे.

सदर कॅम्पचे ठिकाण व वेळापत्रक लवकरच महाविद्यालयांना कळविण्यात येईल.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ नोव्हेंबर, २०११

(प्राचार्य (डॉ.) एम.एस. कु-हाडे)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रती,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकिय आणि शासकिय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क इत्यादी, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

(प्राचार्य (डॉ.) एम.एस. कु-हाडे)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रत माहितीसाठी रवाना :-

१) सह संचालक, पनवेल विभाग, पनवेल, जिल्हा - रायगड.
२) सह संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३) सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४) अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).